# बोदवड महाविद्यालयात स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिराचा समारोप

(१८/०९/२०१९) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, विद्यार्थी विकास विभाग व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड ,विद्यार्थी विकास कक्ष यांच्या तर्फे युवती सभा अंतर्गत स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिराचा समारोप ती. र. बरडीया प्राथमिक विद्यामंदिर येथील मुख्याध्यापिका श्रीमती रंजना कठोके यांच्या प्रमुख उपस्थितीत व महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.विद्यार्थिनींनी आई वडिलांशी संवाद साधून त्यांचा विश्वास संपादन करा, तसेच प्रशिक्षणाचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात कोणत्याही अन्यायाला वाचा फोडून योग्य प्रतिकार करण्यासाठी करावा असा सल्ला श्रीमती रंजना कठोके यांनी विद्यार्थिनींशी बोलतांना दिला. दि.११/०९/२०१९ पासून सलग आठ दिवस राबविण्यात येत असलेल्या शिबिरामध्ये महाविद्यालयाच्या ५५ विद्यार्थिनींना श्री. संजय भाते यांनी ज्युडो कराटे चे प्रशिक्षण दिले.तसेच योग व प्राणायाम याचे देखील प्रशिक्षण योग शिक्षक श्री. शेखरसिंग चौहान यांनी विद्यार्थिनींना दिले.

याप्रसंगी प्रशिक्षित विद्यार्थिनींनी कराटे चे प्रात्यक्षिक करून दाखविले.महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करून त्यांना प्रसंगानुरूप व समोरच्या व्यक्तीचा हेतू ओळखून प्रतिसाद कसा द्यावा याबद्दल सांगितले. आठ दिवस राबविण्यात आलेल्या शिबिराबद्दल विस्तृत माहिती महिला विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. गीता पाटील यांनी दिली.समारोप प्रसंगी कु.चारू माळकरे व कु.अंजु मंगरूळे या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करतांना या शिबिराचा त्यांना कशाप्रकारे फायदा झाला हे सांगून अशा प्रकारच्या उपक्रमाच्या आयोजनासाठी प्राचार्य व महाविद्यालयाचे आभार मानले.

याप्रसंगी विद्यार्थी विकास अधिकारी श्री नरेंद्र जोशी, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ व्ही पी चौधरी, प्रशिक्षक श्री संजय भाते ,तसेच योगशिक्षक श्री. शेखरसिंग चौहान उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु वैशाली पाटील व आभार कु.प्रियंका मावरे हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी विकास कक्षाचे सभासद तसेच अतुल हिवराळे यांनी परिश्रम घेतले.






